**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नागपुरात उद्धाटन.**
2. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अंधत्व मुक्त महाराष्ट्र संकल्पनेतून १० कोटींचे CSR प्रकल्प मंजूर.**
3. **काँग्रेस नव्या जोमानं उभा राहणारा पक्ष असल्याच पक्षाचे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस रमेश चेन्निथला यांचं प्रतिपादन.**
4. **भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी क्रिकेटच्या दुसऱ्या दिवशी पाहुण्या संघाची ६३ धावांची आघाडी.**

-----------------------------------------

राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सव

आदिवासी संस्कृती जपण्यासाठी सरकारनं अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे आणि अनेक नव्या योजना आखल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात दिली. स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीचं औचित्य साधून आयोजित राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्धाटन समारंभात ते बोलत होते.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***आदिवासी आश्रमशाळांचा दर्जा सुधारवण्याचे काम आपण केलं. स्वयंसारखी योजना सुरू केली. यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना होस्टेलमध्ये जर प्रवेश मिळाला नाही तर त्यांना आपण ६० हजार रुपये हे बाहेर शिकण्या करता रहाण्या करता देतो. कुठलाही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहणार नाही हे काम आपल्या सरकारने या ठिकाणी केलं.***

महाराष्ट्रात एक कोटी २५ लाख आदिवासी असून १६ जिल्ह्यात त्यांच्या ४५ जमाती आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. आदिवासींना जल, जमीन आणि जंगलापासून न तोडता त्यांना संरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. आदिवासी नायकांना शोधून त्यांचा इतिहास जगासमोर आणण्यासाठीही सरकारनं

प्रयत्न केल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय रस्ते, परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यावेळी उपस्थित होते. त्यांनी सरकार आदिवासींच्या प्रगतीसाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. आदिवासींच्या कलांना प्रोत्साहन देण्यासाठी कला संगम उपक्रम राबविल्याची माहिती मंत्री उइके यांनी सुरवातीला दिली -

***(होल्ड बाईट - उईके ३२ सेकंद)***

***महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये असलेले आमचे सर्व कलाकार जे आहेत त्या कलाकारांसाठी एक भगवान बिरसा कलासंगम आणि मंच तयार केला संगमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मध्ये असलेले जे कलाकार आहेत वेगवेगळे कलाकार आहेत त्यांचं रजिस्ट्रेशन केलं सगळं आणि त्या रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून वेगवेगळे हस्तकला असो, नृत्य सादरीकरण असो, यु ट्यूब असो असे ४० हजार युवक आणि युवतींनी रजिस्ट्रेशन केलं.***

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'श्रीमती अनसूयाबाई काळे स्मृती सदना'चं आणि पूर्व विदर्भ महिला परिषदेच्या 'नोकरी करणाऱ्या महिला आणि मुलींच्या वसती गृहा'चं उदघाटन केलं.

----------------------------------------

हिंदी विद्यापीठ

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात जनजातीय गौरव दिवसानिमित्त धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आले. परीक्षा नियंत्रक डॉ. सुरेंद्र गादेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार, कुलानुशासक डॉ.राकेश मिश्र आणि डॉ.जयंत उपाध्याय आदींच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी त्यांच्या जीवनमूल्यांचा आदर्श ठेवून समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

----------------------------------------

स्फोट/गुन्हे नोंद

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटप्रकरणी, नवी दिल्ली पोलिसांनी नवीन गुन्हा नोंदवला आहे, तर हरियाणा पोलिसांनी अल फलाह विद्यापीठातील आणखी दोन संशयित डॉक्टरांना ताब्यात घेतले आहे. लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाला भारत सरकारने यापुर्वीच 'दहशतवादी कृत्य' असल्याचं घोषित केलं आहे.

-----------------------------------------

अंधत्व मुक्त महाराष्ट्र

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अंधत्व मुक्त महाराष्ट्र संकल्पनेअंतर्गत, राज्यात CSR निधीतून जवळपास १० कोटी रुपयांचे आरोग्यविषयक प्रकल्प मंजूर झाले आहेत. नागपूर जिल्ह्यात ५,००० तसेच नागपूर-अमरावती विभागात १०,००० मोतीबिंदू शस्त्रक्रियांसह नेत्र तपासणी शिबिरांसाठी मोठा निधी उपलब्ध झाला आहे. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूरमार्फत भूलतज्ज्ञ, नेत्रविज्ञान आणि रेडिओलॉजी विभागासाठी अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठीही अनुदान देण्यात आले आहे. या प्रकल्पांमुळे ग्रामीण आणि दुर्बल घटकांतील रुग्णांना मोफत नेत्रसेवा मिळणार असून प्रदेशातील आरोग्यव्यवस्था अधिक प्रभावी होणार आहे. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी आणि विविध रुग्णालयांशी CSR सहकार्य वाढवून गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविण्याचे पुढील उपक्रमही राबवले जाणार आहेत. CSR निधीचा आरोग्य क्षेत्रासाठीचा हा उपयोग राज्यातील लोककल्याण व सार्वजनिक आरोग्य सेवांना मोठा आधार ठरत आहे.

-----------------------------------------

वडेट्टीवार

पुणे मुंढवा इथल्या कोट्यवधी रुपयांच्या शासकीय जमिनीचा बेकायदेशीर व्यवहार काही निवडक खाजगी व्यक्ती आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने करण्यात आला असून, शासनाच्या मालकीची जमीन हडपण्याचा हा सुनियोजित कट होता असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या प्रकरणात दोषी असलेल्या सर्व अधिकारी आणि लाभार्थ्यांवर तसंच पार्थ पवारांच्या मालकीच्या अमेडिया कंपनीवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांनी पत्र लिहून केली आहे. राज्यसरकारने प्रामाणिकपणा दाखवावा आणि मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही दोषींना वाचवू नये, असं आवाहनही वडेट्टीवार यांनी या पत्राद्वारे केलं आहे. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांनी केलेला हा आरोप योग्य असून या प्रकरणी राज्यशासन तसंच केंद्रसरकारही पार्थ पवार यांना पाठीशी घालत असल्याचं उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथे आज पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

-----------------------------------------

रमेश चेन्नीथला

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसवर झालेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना एआयसीसीचे सरचिटणीस रमेश चेन्नीथला यांनी मुंबईत स्पष्ट केले की काँग्रेस कधीच संपत नाही आणि इंदिरा गांधी आणि  राजीव गांधी यांच्या पराभवानंतरही पक्ष नव्या जोमाने उभा राहिल्याचे इतिहास साक्षी आहे. मुंबई काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिरात ते बोलत होते. या वेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कार्यकर्त्यांना खचून न जाता लढाऊ बाणा अंगी बाळगण्याचे आवाहन केले. मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी उत्साहाने कामाला लागावे, असे ते म्हणाले. सपकाळ यांनी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाला "दिपस्तंभ" संबोधत नफरत छोडो, भारत जोडो या संदेशाची आठवण करून दिली. त्यांनी संविधान रक्षणाचे ध्येय अधोरेखित करत सत्ता नसली तरी काम थांबू नये, नकारात्मकता सोडून पुन्हा लढण्याची तयारी ठेवा, असे आवाहन केले.

-----------------------------------------

रस्त्यांचे डांबरीकरण

नागपूर महानगरपालिकेने शहरातील रस्ते अधिक सुरक्षित आणि सुंदर करण्यासाठी ५३ किमी रस्त्यांचे डांबरीकरण युद्धपातळीवर सुरू केले असून ३१ डिसेंबरपर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठरवलं आहे. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात हॉटमिक्स प्लांट विभाग शहर वाहतूक पोलिसांच्या समन्वयानं  काम करीत आहे. धंतोली, हनुमाननगर, रामनगर-पांढराबोडी, छोटी धंतोली, रामदासपेठ आणि मनीष नगर परिसरातील रस्त्यांचे काम वेगानं  सुरू असून नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून उपद्रव शोध पथक तैनात करण्यात आले आहे.

-----------------------------------------

महाराष्ट्र पक्षी सप्ताह

रामटेक इथं "महाराष्ट्र पक्षी सप्ताह" उत्साहात साजरा करण्यात आला असून ,विविध शाळांतील विद्यार्थ्यांसाठी, विशेष पक्षीनिरीक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला. कॅम्प चेरी फार्म परिसर आणि खिंडसी बॅकवॉटर येथे विद्यार्थ्यांनी ब्लॅक आयबिस, ओपनबिल स्टॉर्क, ग्रे हॉर्नबिल, किंगफिशर यांसह, अनेक स्थलांतरित आणि स्थानिक पक्ष्यांचे निरीक्षण केले. सीएसी ऑलराउंडरचे निसर्ग प्रशिक्षक मनीष मख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पक्ष्यांची ओळख, वर्तन आणि पर्यावरणातील त्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्गसंवर्धन आणि जैवविविधतेची जाणीव करून देण्यात आली.

-----------------------------------------

निमोनिया मोहीम

तीव्र श्वसनदाह आजारामुळे होणाऱ्या बालमृत्यूवरील नियंत्रणासाठी राज्यात १२ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सांस मोहीम राबविली जात असून अकोला जिल्ह्यात घराघरात आरोग्य तपासणी व जनजागृती सुरू झाली आहे. राज्यातील १६.३% बालमृत्यू निमोनियामुळे होत असल्याने प्रतिबंध आणि उपचारांवर विशेष भर देण्यात आला आहे. अकोल्यात ही मोहीम जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्यासह आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात राबविली जात आहे.

-----------------------------------------

अपघात

भंडारा इथं लाखांदूर तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गेटसमोर असलेल्या पान ठेल्यावर काल संध्याकाळी एका खासगी गाडीची धडक बसल्याने तीन जण जखमी झाले. यातील एक जण गंभीर जखमी असून त्याला तातडीने सामान्य रुग्णालय भंडारा येथे हलविण्यात आलं. तर इतर दोघं किरकोळ जखमी असून त्यांच्यावर बारव्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत.

-----------------------------------------

कसोटी क्रिकेट

कोलकाता इथं इडन गार्डनमध्ये सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताचा डाव 189 धावांवर आटोपला भारतातर्फे केएल राहुल आणि वॉशिंग्टन सुंदरसह रिषभ पंत रवींद्र जडेजा मोठी धाव संख्या उभारण्यात अपयशी ठरले. तर दक्षिण आफ्रिकेतर्फे हार्मर या गोलंदाजांना चार गडी बाद केले. दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या डावाला सुरुवात झाली असून भारतीय गोलंदाजांच्या भेदक फलंदाजी पुढे त्यांचा दुसरा डाव देखील गडगडला. दक्षिण आफ्रिकेचा संघ सात गड्यांच्या मोबदल्यात केवळ 93 धावा करू शकला दुसऱ्या दिवस अखेर दक्षिण आफ्रिकेचा संघ 63 धावांनी आघाडीवर आहे.

-----------------------------------------

हवामान

विदर्भात सर्वाधिक कमी किमान तापमान गोंदिया जिल्ह्यात, दहा पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. तर यवतमाळ इथं 11.6, नागपूर आणि भंडारा इथं 12, अमरावती इथं १२.७ तर वर्धा आणि गडचिरोली इथं अनुक्रमे १२ पूर्णांक 9 आणि 12 पूर्णांक 8 इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

-----------------------------------------